# जाहिर निवेदन

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयातील सन 2026-27 या आर्थिक वर्षाकरिता (01.04.2026 ते 31.03.2027 या कालावधीसाठी) मेन सर्व्हर रूममधील EPBAX मशिनची वार्षिक देखभाल व दुरूस्ती (AMC) करणेस्तव सीलबंद दरपत्रके मागविणेबाबत.**

---

कळविण्यात येते की, या कार्यालयातील इंटरकॉम सुविधा अखंडितपणे सुरू राहण्यासाठी अनुभवी पुरवठादारांकडून खालील सविस्तर अटी, शर्ती आणि कामाच्या व्याप्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

## 1. कामाची व्याप्ती (Scope of Work):

- **नियमित देखभाल:** सर्व्हर रूममधील Panasonic NS **3**00 EPABX सिस्टिमची दरमहा किमान एकदा प्रतिबंधात्मक देखभाल (Preventive Maintenance) करणे आवश्यक राहील.
- **दुरुस्ती सेवा:** तांत्रिक बिघाड झाल्यास किंवा इंटरकॉम लाईन बंद पडल्यास, तक्रार प्राप्त झाल्यापासून 2 ते 4 तासांच्या आत दुरुस्ती करणे बंधनकारक असेल.
- **सुटे भाग:** देखभाल करारामध्ये (AMC) किरकोळ सुटे भाग, केबल पंचिंग आणि सॉफ्टवेअर प्रोग्रामिंगचा समावेश असावा.
- **बॅटरी व केबलिंग:** आवश्यकतेनुसार नवीन बॅटरी पुरवणे आणि नवीन केबल टाकण्याचे काम (Laying and Fixing) विहित दराने करावे लागेल.

## 2. अटी व शर्ती:

- **दरपत्रक सादरीकरण:** दरपत्रक **सह आयुक्त (सामान्य)पुणे विभाग, पुणे** यांच्या नावे सीलबंद लिफाफ्यात सादर करावे.
- **मुदत:** दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत **दिनांक 23.07.2026 रोजी सायंकाळी 17.45** वाजेपर्यंत राहील. उपरोक्त मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
- **पात्रता:** पुरवठादाराकडे वैध **GSTN नोंदणी** आणि **PAN कार्ड** असणे अनिवार्य आहे. तसेच अधिकृत सेवा प्रदाता (Authorized Service Provider ) असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे. तसेच पुरवठादाराने दरपत्रकासोबत आपला बँक खाते क्रमांक, IFSC कोड आणि रद्द केलेला चेक (cancelled cheque) जोडणे आवश्यक आहे, जेणेकरून देयक थेट खात्यात जमा करता येईल.
- **अनुभव:** पुरवठादाराला सरकारी कार्यालयातील EPABX देखभालीचा किमान 3 वर्षांचा अनुभव असावा.
- **दराची स्थिरता:** नमूद केलेले दर हे सर्व करांसहित (Including GST) असावेत आणि ते पूर्ण चालू आर्थिक वर्षासाठी तसेच पुढील आर्थिक वर्षासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थिर राहतील. एकदा दर निश्चित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत दरवाढ मान्य केली जाणार नाही.
- **निवड प्रक्रिया व दर (विशेष अट):** ज्या पुरवठादाराचे एकूण नमूद बाबींपैकी जास्तीत जास्त बाबींचे दर सर्वात कमी (L१) असतील, अशा पुरवठादाराला निवडीसाठी प्राधान्य देऊन कार्यादेश पारित केला जाईल. तथापि, ज्या बाबींचे दर सदर पुरवठादाराने जास्त नमूद केले असतील, त्या उर्वरित बाबींचा पुरवठा देखील संबंधित पुरवठादाराला इतर निविदांमधील प्राप्त झालेल्या किमान दराने (L१ Rate) करणे बंधनकारक राहील.

## 3. दंडात्मक तरतुदी (Penalty Clauses):

- **विलंब दंड:** तक्रार नोंदवल्यानंतर तात्काळ 01 तासाचे आत उपस्थित राहणे बंधनकारक राहील. व 24 तासांच्या आत दुरुस्ती करावे लागेल. 01 तासाचे आत उपस्थित न राहिल्यास/24 तासांच्या आत दुरूस्ती न झाल्यास, नियमानुसार कारवाई केली जाईल.
- **काम अर्धवट सोडणे:** जर पुरवठादाराने कराराच्या मध्यातच सेवा बंद केली, तर त्यांना 'काळ्या यादीत' टाकण्याची कार्यवाही केली जाईल.

## 4. देयके आणि प्रदान (Payment Terms):

- **काम पूर्ण झाल्यावर देयके:** विषयांकित कामाची देयके ही सर्व कामकाज समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावरच अदा केली जातील.
- **अग्रिम रक्कम (Advance Payment):** कोणत्याही परिस्थितीत पुरवठादारास कामासाठी **अग्रिम (Advance) रक्कम दिली जाणार नाही.**
- **करांची कपात:** देयके अदा करताना नियमानुसार आवश्यक ते सर्व कर (Taxes) व दंडाची रक्कम (असल्यास) वजा करूनच उर्वरित रक्कम प्रदान करण्यात येईल.

## 5. दरपत्रक नमुना (Financial Bid):

| Sr.No. | Particulars | Unit | Rate(Including GST ) |
|---|---|---|---|
| 1 | **Annual Maintenance Contract charges for Panasonic NS 300 EPABX System AMC** | Annual | |
| 2 | **Exide Battery (12 V 65Ah)** | For each | |
| 3 | **Battery Installation Charges** | For each | |
| 4 | **2 Pair Telephone Cable** (with fitting) | Per Mtr. | |
| 5 | **Cat 6 Cable** (with fitting) | Per Mtr | |

**Important Note for Bidders** - The structural integrity of the cables is of utmost importance. Both the **2-Pair** Telephone Cable and Cat 6 Cable must be of premium quality with certified **anti-rodent** coating/sheathing to strictly prevent any damage from rats, mice, or other rodents. Standard commercial wires without rodent protection will not be accepted. The bidder must specify the Brand/Make of the cables (e.g., D-Link, Finolex, Polycab, or equivalent) in the quotation. The rates quoted must be final and inclusive of all applicable taxes and costs **(including GST, transportation, supply, fitting, casing-capping, testing, and final installation charges).** No additional or hidden charges will be entertained under any circumstances."

## 6. निविदा प्रक्रिया:

- दरपत्रके दिनांक **24.07.2026** रोजी **सकाळी** 11.00 वाजता समितीसमोर उघडण्यात येतील.
- **दरपत्रके मंजूर करण्याचा अंतिम अधिकार दरपत्रक समितीचा राहील. या निर्णयाबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.**
- निवड झालेल्या पुरवठादारास 8 दिवसांच्या आत रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्र/हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

10/7/26

**(तुषार ठोंबरे)**
**सह आयुक्त (सामान्य)**
**पुणे विभाग, पुणे**

**प्रत** :- 1. कार्यालयीन नोटीस बोर्ड,
2. अधिकृत संकेतस्थळ प्रसिद्धीसाठी.